# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २८/०९/२०१७

***राज्याचे मा. राज्यमंत्री गृह (ग्रामीण) श्री. दिपक केसरकर यांनी केला गडचिरोली जिल्हयाचा दौरा***

- **शुर पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार**
- **जिल्हयातील समस्या घेतल्या जाणून**

आज दिनांक २८/०९/२०१७ रोजी मा. राज्यमंत्री गृह (ग्रामीण) वित्त व नियोजन श्री. दिपक केसरकर यांनी गडचिरोली जिल्हयाचा दौरा केला. यामध्ये मंत्री महोदयांनी जिल्हयातील सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेवून जिल्हयातील समस्या जाणून घेतल्या. तसेच जिल्हयात अजून कोणत्या नविन योजना राबविता येतील याबाबत मार्गदर्शन केले. सोबतच पोलीस अधिक्षक कार्यालय येथे उभारण्यात आलेल्या आंतरराज्य समन्वय सभागृहाचे उद्‌घाटनही मा. मंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले. गेल्या एक दिड महिण्यामध्ये झालेल्या पोलीस नक्षल चकमकीमध्ये अत्युत्कृष्ठ कामगिरी बजाविणाऱ्या अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. महेश्वर रेड्डी, सपोनि राजेश खांडवे यांचेसह एकूण १८ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा मंत्री महोदयांनी प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देवून गौरव केला याचबरोबर त्यांच्या कामाचे कौतूक करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.

देशासाठी ज्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले अशा शहीद वीर जवानांच्या कुटूंबियांची भेट घेवून त्यांच्या समस्याही मंत्री महोदयांनी जाणल्या. यावेळी राज्याचे मा. अतिरीक्त पोलीस महासंचालक (विशेष अभियान) श्री. डी. कनकरत्नम, पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परीक्षेत्र श्री. अंकुश शिंदे, पोलीस उपमहानिरीक्षक सीआरपीएफ श्री. टी. शेखर, जिल्हाधिकारी ए. एस. आर. नायक, पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक दिलीप भुजबळ, कमान्डंट १९२ बटालियन के. एस. खुराना, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शांतनु गोयल, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्री. बिपीन इटनकर, अपर पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत तसेच इतर विभागाचे पोलीस अधिकारी उपस्थित होते.








मा.ना.दिपक केसरकर